प्रशा/ T-16/ 200/ 2024

वाचले:

१. आदेश क्रमांक प्रशा/०६/कावि/३१२/२०२३,दिनांक २०/०७/२०२३

२. क्षेत्रीय अधिकारी, 'ड' क्षेत्रीय कार्यालय यांचेकडील अहवाल पत्र.
क्र. डक्षेका/१/कावि/८९९/२०२४ दिनांक ०९/०९/२०२४.

३. अधिकार प्रदान आदेश क्रमांक प्रशा/२/कावि/७९५/२०१७ दिनांक ०१/११/२०१७.

४. अधिकार प्रदान आदेशक्रमांक – प्रशा/२/कावि/७४/२०२१ दिनांक २८/०१/२०२१.

५. सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक १० /१२/२०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८
क्र. साप्रवि/६अ/कावि/५५७/२०२४
दिनांक: १० /१२/२०२४

विषय:. श्रीम.निम्हण मनिषा गोपाळ सं.क्र.(१३५७५) यांचा
लिपिक पदाचा परिविक्षाधीन कालावधी वाढविणे बाबत......

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर श्रीम.निम्हण मनिषा गोपाळ यांची वाचले क्र.१ चे आदेशान्वये पे लेवल S-6 वेतनश्रेणी र.रु.१९९००-६३२०० या वेतनश्रेणीत "लिपिक" पदावर रूजू तारखेपासून प्रथमत:१ वर्ष परिविक्षाधीन कालावधीकरीता आदेशामध्ये नमूद केलेल्या अटी व शर्ती वर पूर्णत: हंगामी स्वरूपाची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुसार श्रीम.निम्हण मनिषा गोपाळ ह्या दिनांक २१/०७/२०२३ रोजी प्रशासन विभागात लिपिक या पदावर रूजू झाल्या आहेत. त्यांचा परिविक्षाधीन कालावधी दिनांक २०/०७/२०२४ रोजी संपुष्टात आला आहे.

क्षेत्रीय अधिकारी, 'ड' क्षेत्रीय कार्यालय यांनी उपरोक्त वाचले क्र.२ च्या पत्राअन्वये श्री. निम्हण मनिषा गोपाळ यांचा कामकाज अहवाल सादर करण्यात आला असून त्यामध्ये श्रीम.निम्हण मनिषा गोपाळ यांचे परिविक्षाधीन कालावधीमधील कामकाज,उपस्थिती व वर्तणुक समाधानकारक आहे. सदर कर्मचा-याचे विरुध्द कोणतीही खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावित नाही असे सदर अहवालामध्ये नमूद केलेले आहे. श्रीम.निम्हण मनिषा गोपाळ, लिपिक यांनी नियुक्ती आदेशातील अट क्र. ९ नुसार इंग्रजी ४० श.प्र.मि.व मराठी ३० श.प्र.मि. टंकलेखन प्रमाणपत्र विहित मुदतीत (२ वर्ष) सादर करणे बंधनकारक होते. परंतु श्रीम.निम्हण, यांनी अद्यापपर्यंत टंकलेखन प्रमाणपत्र सादर केलेले नसल्याने श्रीम.निम्हण यांचा परिविक्षाधीन कालावधी वाढविणेकामी स्पष्ट शिफारस केली आहे.

सबब मी उप आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, उपरोक्त वाचले क्रमांक ३ व ४ अन्वये प्राप्त अधिकारानुसार प्रस्तूतच्या आदेशान्वये श्रीम.निम्हण मनिषा गोपाळ, लिपिक यांचा परिविक्षाधीन कालावधी पुढील एक वर्षा करीता (दिनांक २१/०७/२०२४ ते २०/०७/२०२५ अखेर) वाढविणेस मान्यता देत आहे.

प्रस्तूत आदेशाची नोंद श्रीम.निम्हण मनिषा गोपाळ यांच्या सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

(विठ्ठल जोशी)
उप आयुक्त
सामान्य प्रशासन विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११० १८.

प्रति, श्रीम.निम्हण मनिषा गोपाळ, लिपिक

प्रत:-१) लेखा विभाग २) लेखा परिक्षण विभाग ३) मागासवर्ग कक्ष
४) सेवाज्येष्ठता कक्ष ५) संगणक कक्ष (सामान्य प्रशासन विभाग)
६) संबधित विभाग---ड क्षेत्रीय कार्यालय